प्रकरण तिसरे

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा

प्रकरण तिसरे

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा

प्रास्ताविक

१. दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा

१.१ अस्तित्वशोधासाठी धडपडणाऱ्या व्यक्तिरेखा

१.२ एकाकीपणे जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखा

१.३ अलौकिक व्यक्तिमत्वाचा व्यक्तिरेखा

१.४ स्त्री व्यक्तिरेखा :

१.४.१ पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी कुचंबना

सारांश

प्रकरण : तिसरे

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा

प्रास्ताविक :

कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा हा महत्त्वाचा घटक आहे. कथात्म वाङ्मयामध्ये एक अपरिहार्य गोष्ट म्हणून व्यक्तिरेखांना महत्त्वाचे स्थान असते. कथात्म साहित्याचा आजवरचा इतिहास पाहिला तर तिचे सुरवातीचे स्वरूप कथानकाच्या गुंतागुंतीकडून व्यक्तिदर्शनाच्या सूक्ष्मतेकडे गेलेले दिसून येते. नवकथेच्या उगमापासून तर व्यक्तिच्या बाह्यचित्रणाबरोबर अंतर्मनाचे आणि मनोविश्लेषणाचे महत्त्व वाढीस लागलेले दिसून येते. आजच्या समकालीन कथात्म साहित्यातील व्यक्तिदर्शन जीवनानुभवाच्या विविध स्तरावर आणि पातळयांवर मांडले जाऊ लागले आहे. मराठी कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा या प्रगल्भ आणि सखोल होऊ लागल्या आहेत. हे मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये आढळणाऱ्या व्यक्तिरेखा या पारंपरिक रूढ व्यक्तिरेखांपेक्षा अगदी वेगळया स्वरूपाच्या आहेत. त्यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा ह्या अस्तित्वशोधाच्या धडपडीने प्रेरित झालेल्या दिसून येतात. ह्या व्यक्तिरेखांना विविधांगी वैशिष्ट्यपूर्णता लाभली आहे. विचित्र, विक्षिप्त, अलौकिक आणि सकृतदर्शनी विकृत वाटणाऱ्या पण परिस्थितीनुरूप वर्तन करणाऱ्या व्यक्तिरेखा चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये दिसून येतात.

प्रस्तुत प्रकरणामध्ये दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांचा परामर्श घ्यावयाचा आहे. हा विचार अर्थातच त्यांच्या कथात्म साहित्यकृतींच्या आशयाच्या संदर्भात मांडावयाचा आहे. दिलीप चित्रे यांचे सबंध कथात्म साहित्य मानवी जीवनातील अस्तित्व जाणिवेने प्रेरित झालेले आहे. त्यामुळे त्यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखाही याच आशयविश्वाशी संबंधित असतात. या व्यक्तिरेखांचा परामर्श आपण प्रस्तुत प्रकरणामध्ये

घ्यावयाचा आहे.

१. दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा :

व्यक्तिरेखा या कथात्म वाङ्मयातील मुख्य घटक म्हणून समीक्षकांनी त्याची विविधांगी चर्चा केलेली दिसून येते. व्यक्तिरेखांच्या माध्यमातून कथावस्तू गतिमान होते. कथात्म स्वरूपाच्या सर्वच वाङ्मय प्रकारात व्यक्तिरेखांची अपरिहार्यता जाणवते. पारंपरिक सौंदर्यनिष्ठ, वास्तववादी अभिव्यक्ती असो अथवा अलीकडील प्रायोगिक माध्यमातून अवतरलेले कथात्म साहित्य असो या सगळयांमध्ये व्यक्तिरेखांना अपरिहार्य स्थान आहे. ह्या व्यक्तिरेखा विविध स्वभावाच्या, जडणघडणीच्या, प्रवृत्तीच्या असतात. दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये या सर्व प्रकारच्या व्यक्तिरेखांचा परिचय आपणास स्वाभाविकपणे घडताना दिसून येतो

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील केंद्रबिंदू 'माणूस' आहे. त्यांच्या बहुतेक कथा व लघुकांदवऱ्या या पुरुषप्रधान आहेत. पुरुषप्रधान व्यक्तिरेखांचे प्रभावी चित्रण त्यांच्या कथात्म साहित्यामध्ये झाले आहे. या सर्व व्यक्तिरेखा मध्यमवर्गीय जीवन जगणाऱ्या महानगरीय व्यक्तिरेखा आहेत. त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा या महानगरीय जीवनामध्ये एकाकी जीवन जगताना दिसून येतात. त्यांच्या व्यक्तिरेखा प्रामुख्याने ३०-३५ वयोगटातील असून बहुतेकजण अविवाहित आहेत. त्यांची अस्तित्वशोधासाठी, जगण्यासाठी चाललेली धडपड विलक्षण आहे. या व्यक्तिरेखा एकाकीपणाच्या, मानसिक, शारीरिक कोंडीच्या, नियतीशरणतेच्या, परात्मतेच्या तसेच अस्तित्वशोधाच्या चक्रव्यूहात सापडलेल्या दिसून येतात. दिलीप चित्रे यांच्यावर अस्तित्ववाद तसेच अतिवास्तववादाचा प्रभाव असल्यामुळे त्यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा या जाणिवा घेऊनच अवतरतात.

पारंपरिक, वास्तववादी आणि स्वाभाविक चित्रण कारणाऱ्या व्यक्तिरेखांपेक्षा वेगळी भूमिका चित्रे आपल्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांविषयी घेताना दिसून येतात. चित्रे हे १९६० नंतरच्या कालखंडातील एक महत्वाचे प्रयोगशिल साहित्यिक आहेत. त्यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा ह्या सर्वसामान्य वाचकांच्या आकलनक्षमतेपलिकडच्या आहेत.

ह्या व्यक्तिरेखा वाचकांच्या सरळ वाचनप्रक्रियेमध्ये अडथळा आणणाऱ्या आहेत. चित्रे यांचे संबंध कथात्म साहित्य एका विशिष्ट तत्त्वाला, जाणिवेला बांधलेल्या प्रगल्भ आणि गंभीरतेचे दर्शन घडविणाऱ्या आहेत, त्यामुळे व्यवहारी जग आणि परंपरागत समाजजीवन, त्यातले अनुभव व वास्तवता यांच्या कथात्म साहित्यात येत नाही. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखाही वाचकांच्या नेहमीच्या वाचनकक्षेत सापडणार नाहीत. त्यांच्या व्यक्तिरेखा ह्या एक वेगळा असा विलक्षण अनुभव देणाऱ्या ठरतात. प्रथमदर्शनी समाजापासून तुटलेले, मनोविकृत, एकाकी जीवन जगणाऱ्या आणि स्वप्नविश्वात रमणारी पात्रे त्यांच्या साहित्यातून पहावयास मिळतात. पण कथावस्तुचा परिणाम जेव्हा वाचकांवर होतो, तेव्हा त्या व्यक्तिरेखां चित्रणातील गांभीर्य ध्यानात येते.

प्रचलित समाजजीवनाशी, नैतिक मूल्यापासून, तुटलेपण, अस्तित्वाचा शोध, मानवाचा देह, देहाचे प्रश्न, लैंगिकता, शरिरसंबंध, जगण्यातील फोलपणा, मानवी नात्यातील शक्याशक्यता, मानवी जगण्यातील परात्मता, एकाकीपण, त्यांच्या आदिम प्रेरणा, प्रवृत्ती, त्यांची क्रूरता, नियतीशरणता या सर्व गोष्टींनी चित्रेंच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा प्रभावित झालेल्या दिसतात. म्हणून त्यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा ह्या मनोविकृत, विक्षिप्त स्वरूपाच्या वाटतात. मराठी पारंपरिक कथात्म साहित्यातील कौटुंबिक परिस्थिती, घरगुतीपणा, आस्थेची नाती चित्रे यांच्या साहित्यात कुठेही पहावयास मिळत नाहीत, तर ह्या व्यक्तिरेखा व्यक्तिगत प्रश्नांनी गांजलेल्या, या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी धडपडणाऱ्या, भावना संवेदना आणि सामाजिक जाणिवा यांना फाटा देणाऱ्या आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांचे वर्गीकरण करणे क्रमप्राप्त आहे. म्हणून अस्तित्वशोधासाठी धडपडणाऱ्या व्यक्तिरेखा, एकाकीपणे जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखा, अलौकिक व्यक्तिमत्वाच्या व्यक्तिरेखा, स्त्री-व्यक्तिरेखा असे वर्गीकरण केले आहे. प्रस्तुत प्रकरणात आपणाला चित्रे यांच्या विविधांगी व्यक्तिरेखांचा परामर्श घ्यावयाचा आहे.

१.१ अस्तित्वशोधासाठी धडपडणाऱ्या व्यक्तिरेखा :

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यावर आस्तित्ववादी विचारसरणीचा फार मोठा प्रभाव आहे. मानवी अस्तित्वविषयक अनेक प्रश्न या विचारप्रणालीने मांडले आहेत. अस्तित्ववादात 'अस्तित्व' हा शब्द मानवी अस्तित्व या अर्थाने येतो. असण्याची जाणीव 'अस्तित्व' या शब्दापाठीमागे आहे. आधुनिक काळात माणसाने हरवलेल्या 'मी' पण शोधण्याचा प्रयत्न दिलीप चित्रेंनी आपल्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांच्या माध्यमातून केला आहे. अस्तित्वाचे भान येणे अस्तित्वशोधासाठी महत्वाचे ठरते. "अस्तित्वाचे भान या गोष्टीवर फार भर स्वत: चित्रे यांनी दिला आहे. जगावेसे वाटणे, मर्त्य आहोत हे ठाऊक असूनही जगावेसे वाटणे या गोष्टीला चित्रे यांनी महत्व दिले आहे."[१] देहाचे प्रश्न व त्याची उकल करणे यावर अस्तित्ववादी विंचारसरणीचा भर असतो. लैंगिक प्रेरणा हा देहाचा प्रमुख विषय आहे. म्हणून चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा लैंगिक अनुभवातून, दैहिक पातळीवरून अस्तित्वाचा शोध घेताना दिसतात. त्याचप्रमाणे मानवी जीवनातील असतेपणाची जाणीव, जीवनातील व्यस्तता, परात्मता, एकाकीपणा व्यक्त करण्यासाठी चित्रे अस्तित्ववादी विचारसरणीचा आधार घेताना दिसतात. "दिलीप पुरूषोत्तम चित्रे ह्यांच्या कथा व आत्यंतिक व्यक्तिकेंद्रित आहे. अस्तित्वाचा कणा शोधणाऱ्या साहित्याला व्यक्तिकेंद्री बनणे अगत्याचे असते, कारण ती एक संपूर्णपणे वैयक्तिक बाब असते. त्यामुळे अशा साहित्यात खूप वैयक्तिक तपशील येत राहतात."[२] म्हणून चित्रें यांच्या कथात्म साहित्यकृती या त्यांच्या वैयक्तिक अनुभवातून स्फुरलेल्या आहेत. अशावेळी प्रथमपुरूषी निवेदन पद्धतो वापरून 'मी' या व्यक्तिद्वारे हे अनुभवविश्व चित्रें यांनी अचूकपणे टिपले.

'ऑर्फियस कथासंग्रहातील पहिलीच कथा 'ऑर्फियस' अस्तित्वशोधाच्या दृष्टीने महत्वाची ठरते. या कथेचा नायक 'मी' ॲना आव्हाकियान या मृत झालेल्या आर्मेनियन तरूणीच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. या कथेतील नायक परदेश दौऱ्यावर गेलेला असतो. एका स्मशानभूमीत त्याला ॲना आव्हाकियान या तरूणीचे थडगे दिसते. योगायोग म्हणजे नायकाचा व ॲनाचा जन्म एकाच दिवशी, एकाच वर्षी झालेला असतो. व

वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी ॲना मृत झालेली असते हे सर्व पाहून नायकाच्या मनामध्ये ॲनाच्या असतेपणाबद्दल, अस्तित्वाबद्दल कुतूहल निर्माण होते. ती कशी दिसत होती, ती कशाने मेली इत्यादी प्रश्नांनी नायकाची अवस्था गोंधळलेली होती. शेवटी एका स्वप्नसदृश्य दृश्यात नायकाला ॲनाचे दर्शन होते. ॲनाच्या अस्तित्वाचा शोध घेण्यासाठी चाललेल्या नायकाच्या धडपडीचे चित्रण चित्रे यांनी एक लोकविलक्षण अनुभवातून केले आहे.

'केसाळ काळंभोर पिल्लू' या कथेचा नायक विठ्ठल महादेव जामखेडकर हा आहे. स्वत:चे अस्तित्वच हरवून बसलेला हा नायक स्वत:च्या अस्तित्वासाठी धडपडताना दिसतो. असा हा नायक स्वत:साठी विठ्ठल महादेव जामखेडकर हे नाव स्विकारतो. पण त्याच्या लेखी स्वत:च्या नावाला फारसे महत्त्व नाही. तो म्हणतो, "माझं नाव विठ्ठल महादेव जामखेडकर किंवा आणखी काही असतं तरी फारसा फरक पडला नसता. माझ्या नावाला महत्व होतं ते या जगात ओळखलं जाण्यापुरतं."[३] अशा या वयाची तिशी उलटून गेलेल्या, हस्तमैथून व स्वप्नसंभोग करणाऱ्या, एकाकीपणे जगणाऱ्या, जगण्यात अर्थ नसलेल्या पण तरीही जगण्याची उत्कट इच्छा असणाऱ्या नायकाची अस्तित्वशोधासाठी चाललेली धडपड या कथेत चित्रित होते. विठ्ठल हा एका ऑफिसमध्ये कारकून आहे. त्याची वरिष्ठ असणारी राणेबाई हीसुद्धा एकाकीपणे जीवन जगणारी आहे. दोघांचे संबंध घडून येतात. या संबंधातच विठ्ठलला अस्तित्वाची जाणीव येते. मानसिक, शारीरिक कोंडलेपणामुळे माणूस अस्तित्वहीन होतो. अशा वेळी त्याला लैंगिक अनुभवच उत्स्फूर्त व उत्कट वाटतो. त्यातच त्याला अस्तित्वाचा शोध लागण्याची शक्यता असते. विठ्ठलच्या अस्तित्वशोधासाठीच्या धडपडीचे चित्रण या कथेत येते.

'स्कॉर्पिओ' या कथेतून दुर्मीळ होत चाललेल्या पारशी समाजाचे चित्रण येते. नर्गिसच्या करूण अस्तित्वाची कथा चित्रे या कथेतून रेखाटतात. नर्गिस ही या कथेतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. तृतीयपुरुषी निवेदन पद्धतीतून साकारणारी ही कथा नर्सिंगच्या उध्वस्त भावविश्वाचा आलेख मांडणारी आहे. नर्सिंगचा भाऊ गुस्ताद जन्मत: वेडा आहे. त्याला सांभाळण्याची जबाबदारी नर्गिसची आहे. म्हातारे आई-वडील व गुस्ताद समवेत ती

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

एकाकी जीवन कंठीत आहे. गुस्तादची देखभाल करता-करता नर्गिसच्या मानसिक, शारीरिक इच्छा-आकांक्षांचा कोंडमारा होत असतो. ती लग्नही करू शकत नाही. अशाप्रकारे नर्गिसच्या उध्वस्त भावविश्वाचे चित्रण 'स्कार्पिओ' या कथेतून येते.

दिलीप चित्रे यांचे संवंध कथात्म साहित्य हे अस्तित्वशोधाशी निगडीत असून हा अस्तित्वशोध ते निकराच्या आत्मभानाने घेताना दिसतात. त्यांच्या साहित्यकृतीतील व्यक्तिरेखा ह्या रूढ, पारंपरिक कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांपेक्षा भिन्न ठरतात. आधुनिक काळामध्ये माणसांच्या जीवनातील सर्वच कृतींना आलेला यांत्रिकपणा त्यांच्या व्यक्तिरेखांद्वारे प्रकट होताना दिसून येतो. अशा व्यक्तिरेखांमध्ये 'चतुरंग' या लघुकादंबरीसंग्रहातील 'रुधिराक्ष' ही महत्वाची व्यक्तिरेखा आहे. रुधिराक्ष हा मानसिक व्याधीने ग्रस्त असा माणूस आहे. त्याचे डोळे रक्ताळलेले आहेत म्हणून त्याचे नाव 'रुधिराक्ष' आहे. रुधिराक्ष हा सामान्य माणसासारखा नाही. तो एक असामान्य व्यक्तिमत्वाचा आहे. त्याला कुठेही झटका येऊ शकतो आणि तो कोसळू शकतो. वसंत आबाजी डहाके म्हणतात त्याप्रमाणे, "रूधिराक्ष ही या कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. रुधिराक्ष घरी, दारी, गर्दीत कुठेही कोसळून वेशुद्ध होऊ शकतो ही या संबंध कादंवरीतील महत्वाची घटना आहे."[४] तसेच टेंपररी ब्लाइंडनेसमुळे काही वेळ त्याची स्मृती भ्रंश होते. त्याच्या मेंदूमध्ये जी गाठ झाली आहे त्याचे दर पंधरा दिवसांनी ऑपरेशन करावे लागते. त्यामुळे त्याच्यात मानसिक विकृती निर्माण झाली आहे. रुधिराक्ष हा ड्रेनेज उपसण्याचं काम करतो. त्याच्या मते ते एक वैश्विक काम आहे. पण गटारं साफ करण्यापर्यंतच त्याचे काम मर्यादित नसून वसंत आबाजी डहाके म्हणतात त्याप्रमाणे, "रुधिराक्ष गटारं साफ करण्याचं काम करतो पण प्रत्यक्षात मात्र तो एक कलावंत आहे. एका अर्थी तो समाजाची गटारं साफ करतो."[५] सर्वसामान्य माणूस आपल्याच अस्तित्वापासून दूर पळण्याचा प्रयत्न करतो. या वृत्तीवर आघात करत रूधिराक्ष माणसाचं असणारं मूळपण शोधण्याचा प्रयत्न करतो. एकूणच सर्वसामान्य माणसाची विचार करण्याची शक्ती एका ठराविक मर्यादेपर्यंत सिमीत असते. पण सर्वसामान्य माणसाची विचार करण्याची शक्ती ज्या ठिकाणी संपते तिथून रूधिराक्ष विचार करायला सुरूवात करतो.

रुधिराक्षची एक प्रेयसी आहे. मध्यरात्री ड्रेनपाईपवरून वर चढून मैत्रिणीचा तिच्या नवऱ्याबरोबर चाललेला संभोग पाहण्याचा रुधिराक्षचा नित्यक्रम आहे. आपली प्रेयसी नवऱ्याबरोबर सुखी नसल्याची जाणीव रुधिराक्षला सतत जाणवत असते. रुधिराक्षीच्या विचित्र वर्तनाने त्याची मैत्रिण चिंतीत झालेली असते. रुधिराक्षने सामान्य माणसासारखे वर्तन करावे असे तिला वाटत असते. पण रूधिराक्षची विचारदृष्टी काही वेगळीच असते. मैत्रिणीला आपल्या नवऱ्याबरोबर पूर्ण समरस होऊन संभोग करताना रुधिराक्षल पहायचे असते. तिच्या संवेदनाहीन जननेंद्रियात संभोगसुखाची थरथर त्याला पहायची होती, संभोगसुखाने परिपूर्ण झालेला मैथुनमग्न चेहरा सुखाने चिंब झालेला रुधिराक्षला पहायचा होता. याबाबत वसंत आबाजी डहाके म्हणतात त्याचप्रमाणे, "आधुनिक काळामध्ये यांत्रिकीकरणामुळे लोकांच्या संवेदना बधिर होऊ लागल्या आहेत आणि आदिमानवापासून असलेले मानवीपण नष्ट होऊन त्याचे यांत्रिक बाहुल्यामध्ये रूपांतर झाले आहे. त्याच्या विरोधी रुधिराक्ष भाष्य करतो."[६] हे विधान समर्पक वाटते रूधिराक्ष ही व्यक्तिरेखा एकूणच मानवी अस्तित्वाचा शोध घेताना दिसते. माणसाच्या आदिमपणातील मूळपणा शोधते आणि हा शोध घेताना तो पारंपरिक संकेत बाजूला सारून संबंध जीवनव्यवहाराकडे एका निकोप दृष्टीने पाहतो.

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या बहुतांशी व्यक्तिरेखा या दैहिक अनुभवांचा वेध घेणाऱ्या आहेत. त्या सर्वच व्यक्तिरेखा दैहिक अनुभवातून अस्तित्त्व शोधाचा प्रयत्न करतात. अस्तित्त्ववादी जाणीवेला फक्त लैंगिक/दैहिक अनुभव उत्कट व उत्स्फुर्त वाटत असल्यामुळे चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा ह्या दैहिक अनुभवाचा वेध घेताना दिसतात. 'ऑर्फियस' या कथासंग्रहातील 'ऑर्फियस', 'दहा हजार शब्द', 'मेथिड्रिल', 'केसाळ काळंभोर चिल्लू', 'स्कॉर्पिओ' या कथांतील तसेच 'चतुरंग' या लघुकादंबरी संग्रहातील व्यक्तिरेखा ह्या दैहिक अनुभवाचा वेध घेताना दिसतात. म्हणून दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये स्त्री-पुरुष संबंधांना महत्त्वाचे स्थान आहे. दैहिक अनुभवाचा वेध घेणाऱ्या व्यक्तिरेखा चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये विशेषत्त्वाने पहावयास मिळतात.

१.२ एकाकीपणे जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखा :

दिलीप चित्रे यांचे कथात्म साहित्य लोकविलक्षण व्यक्तींनी गजबजलेले आहे. या साऱ्या व्यक्ती अगदी एकाकी जीवन जगणाऱ्या आहेत. दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तींचा एकाकीपणा हे एक महत्वाचे सूत्र आहे. आधुनिकीकरणाची ती एक देणगी आहे म्हणून चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील वहुतांशी व्यक्तिरेखा या एकाकी पणाने ग्रासलेल्या दिसतात. त्यांची जीवनेच्छा मोठी जवर आहे, पण त्यांच्या वाटयाला आलेले एकाकीपण भेडसावून टाकणारे आहे. गर्दीमध्ये तो वावरत असूनही एकाकीच आहे. त्याच्या जीवनाला कसलेच प्रयोजन नाही. कोणत्या तरी सामाजिक सुधारणेच्या सिद्धीसाठी, कसल्यातरी क्रांतीसाठी, कोणत्याही मार्गाने व्यावहारिक यश मिळविण्यासाठी किंवा अगदी एका क्षुद्र हेतूसाठी माणूस धडपडत असतो, आपले जीवन जणू तो उधळून टाकीत असतो आणि कृतार्थ होत असतो. आपल्या जीवनाला काहीतरी प्रयोजन आहे म्हणून जगण्यात त्याला अर्थ वाटत असतो, पण आजच्या आधुनिक जगात माणूस एक आंधळे, अगतिक वेडे दु:ख भोगत एकाकी जीवन जगत आहे. अन्न, वस्त्र, निवारा आणि कामसुख मिळाले तरी त्याचे अंतरिक दु:ख शिल्लक उरतेच. या विश्वरचनेपासून पूर्णाशाने तुटलेला, दुरावलेला माणूस आपल्याला दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये पहावयास मिळतो.

त्याचप्रमाणे मागे उल्लेख केल्याप्रमाणे चित्रे यांचे कथात्म लेखन हे आत्यंतिक व्यक्तिकेंद्री स्वरूपाचे आहे. भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे, "एखादी मन:स्थिती कथेचे रूप घेऊ लागते तेव्हा लेखकाच्या व्यक्तिमत्वाशी तिचे धागे अगदी अपरिहार्यपणे गुंतले जातात."[७] त्यामुळे चित्रेंच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखाा ह्या त्यांच्या भावविश्वाच्या अनुभवविश्वाचा आलेख मांडणाऱ्या ठरतात.

एकाकीपणे जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखांमध्ये 'दहा हजार शब्द' या कथेतील प्रोफेसरांची व्यक्तिरेखा महत्वाची आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष यातील अर्थ आणि काम यांच्या साधनेभोवती माणसाने हजारो गुंतागुंतीचे विधी निर्माण केले आहेत आणि ह्या गुंत्यात अर्थ आणि काम कशासाठी या विषयावर प्रोफेसर चिंतनपर लेखन करीत असतात. दुसरीकडे

प्रोफेसर आणि त्यांची पत्नी यांच्या वयामध्ये खूप तफावत आहे. प्रोफेसरांनी आपल्यापेक्षा पंधरा वर्षांनी लहान असणाऱ्या सुलूशी लग्न केले आहे. पंधरा वर्षांनी लहान असलेल्या पत्नीला प्रोफेसर परिपूर्ण शरिरसूख देऊ शकत नाहीत ही त्यांची खंत आहे. ही जाणिव जेव्हा प्रोफेसरांना येते, त्यावेळी त्यांना अगदी एकाकी वाटू लागते. त्यांच्या या एकाकी अवस्थेचे चित्रण या कथेत येते. "चालताना प्रोफेसरांना खूप बोलावसं वाटत होतं. पण समुद्राचा आवाज इतक्या मोठयानं येत होता की, त्यांना बोलायची ताकद झाली नाही."[८] यासारख्या विधानातून प्रोफेसरांची एकाकी मनोवस्था चित्रेंनी अचूकपणे टिपली आहे.

'वांसासि जिर्णानि' या कथेतील कुलकर्णीही अगदी एकाकी आहेत.ते एकटेच राहतात पन्नाशीच्या पुढे वय असलेल्या कुलकर्ण्यांचे बाह्यवर्णन या कथेत समर्पक शब्दात मांडले आहे. "कुलकर्ण्यांचा चेहरा, त्यांच उभं राहणं, त्यांच्या हातांच्या हालचाली, त्यांचं बोलणं ह्या सर्वात काहीतरी अशुभसूचक आणि अटळ होते. लाखात असा चेहरा एखादाच असतो. त्यांचं वय पन्नाशीच्या पुढं असेल त्यांच्या कपाळावर पुष्कळ सुरकुत्या होत्या. ते उभट होते आणि गालांची खोलगट हाडं, सरळ नाक, अरूंद जिवणी आणि अत्यंत लहान हनुवटी ह्यामुळं हा उभटपणा जास्तच ठसून दिसत होता."[९] अशाप्रकारच्या वर्णनांमुळे कुलकर्ण्यांना व्यक्तिरेखा थेट डोळ्यासमोर उभी राहते. जशा या कुलकर्ण्यांना अध्यात्माचे वेड आहे. आध्यात्मावरची त्यांची दोन-चार पुस्तकेही प्रसिद्ध आहेत, शिवाय सत्पुरुषांच्या स्पर्शानं मेलेल्या व्यक्ती कशा जिवंत होऊ शकतात यावर त्यांचा विश्वास आहे. अशाप्रकारे गुठ, विक्षिप्त स्वभाव असणाऱ्या कुळकर्ण्यांच्या एकाकी जीवनाचा वेध चित्रेंनी 'वासांसि जिर्णानी' या कथेत घेतला आहे.

'केसाळ काळंभोर पिल्लू' या कथेत मिसेस राणेबाईच्या एकाकीपणाचा वेध चित्रेंनी घेण्याचा प्रयत्न केला आहे.भल्या पगाराची नोकरी, कर्तबगार म्हणून लौकिक, उच्चवर्गीयांच्या वस्तीमध्ये घर, गाडी इत्यादी सारी भौतिक सुखाने परिपूर्ण असूनही मिसेस राणेबाई एकाकीच आहे. लूत लागलेले कुत्रे चावले म्हणून तिच्या लहानपणी तिच्या वडिलांनी तिचे आवडते कुत्र्याचे पिल्लू ठार केले.या घटनेचा राणेबाईच्या बालमनावर खूप मोठा आघात

होतो. त्या पिल्लाच्या जीवनाबद्दल तिच्या वडिलांनी जो कठोर निर्णय घेतला, त्याबाबत ती सगळ्या मानवतेच्या क्रूरवृत्तीला जबाबदार धरते. महाविद्यालयीन जीवनामध्ये अर्धवट झोपेत असताना एका अल्पवयीन मुलाने तिच्याशी संभोग केला. पुढे मिसेस राणेंच्या लग्नानंतरही त्यांना सुखी संसार लाभला नाही. लग्नानंतर तिच्या नवऱ्यानेही आस्थेने, प्रेमाने तिच्याशी संबंध ठेवले नाहीत. त्यामुळे राणेबाईच्या मानसिक, शारीरिक गरजांचा कोंडमारा झाला. त्यामुळे त्यांना एकाकी वाटू लागते व सुखाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. ऑफिसमध्ये कारकून असणाऱ्या विठ्ठलमध्ये आपले हरवलेले सुख शोधण्याचा प्रयत्न मिसेस राणे करते. शेवटी मिसेस राणेंचा मृत्यु होतो. खून की आत्महत्या या संदिग्धतेतच या कथेचा शेवट होतो.

'तिडिक, तिरडी आणि अनंतकाळ' मधील नायक सदाशिव हा सुद्धा महानगरीय जीवनामध्ये एकाकी जीवन जगणारा आहे. गर्दीपासून तो नेहमी दूर राहण्याचा प्रयत्न करतो. स्वच्छतेच्या वेडाने त्याला पछाडले आहे. आपल्या भोवतालचे सारे जग अस्वच्छ असून आपण तेवढे स्वच्छ आहोत असे त्याला वाटत असते. रक्त, घाम यासारख्या चिकट द्रव्यपदार्थाची त्याला भिती वाटते. गर्दीपासून तो स्वत:ला अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करतो. निर्भयपणे जीवनाला स्पर्श करण्याची हिम्मत नाही. म्हणून स्वत:चा मनोविश्वात आपण स्वतंत्र आहोत अशा कल्पनेत त्याने स्वत:ला मनोविश्वात आपण स्वतंत्र आहोत अशा कल्पनेत त्याने स्वत:ला गुंतवून घेतले आहे. माणसाचे जग अस्वच्छ, किळसपणे, घाणीने बरबरटलेले आहे. असा भोंदू व कातडीबचाऊ पवित्रा सदाशिवने घेतला आहे. इथून पळ काढला पाहिजे हा एकच नाद त्याच्या अंतकरणात भोवऱ्यासारखा गरगरतो आहे. सदाशिवची ही फसवी डिटॅचमेंट प्रत्येक माणसात आहे. सभोवतालच्या जीवनाकडे उपरोधाने पाहणारा नायक या कथेत चित्रित झाला आहे. माणसातल्या या विसंगतीची थट्टा चित्रेंनी सदाशिव या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून या कथेत घेतली आहे.

'टाइपरायटर' या कथेचा नायकही एकाकीच आहे. भालचंद्र फडके म्हणतात, "विराट नियमबद्ध जीवनाचे मर्मच त्याला समजलेले नाही. सुखाची व दु:खाची बांधणी कशी काय होते हे त्याला कळलेले नाही. म्हणून तर धुरकट रंगाच्या इमारतीत तो एकाकी जगत

आहे."[१०] टाइपरायटर ही एक व्यंगकथा आहे. जगातील व्यवहाराकडे तटस्थपणे पाहू न शकलेल्या 'मी' या व्यक्तिरेखेचे व्यंगचित्र चित्रेंनी रेखाटले आहे. या कथेतील नायकाला वेडा ठरवून वेड्यांच्या इस्पितळात आणण्यात येते. सामान्य माणसासारखा दिसणारा सामान्य माणसासारखे वर्तन करणारा हा नायक डॉक्टरांना असामान्य, वेडा वाटतो. त्या शहाणा करण्यासाठी डॉक्टर त्याला टाइपरायटर देतात. उत्कटपणे जीवन जगू इच्छिणारा नायक आणि त्याला असामान्य, वेडा ठरणाऱ्या समाजाचे व्यंगचित्र चित्रेंनी 'मी' या व्यक्तिरेखेद्वारे रेखाटले आहे.

नर्गिसच्या एकाकी जीवनाची व्यथा 'स्कार्पिओ' या कथेतून चित्रेंनी मांडली आहे. एकलकोंडे जीवन आम्ही जगतोय अशी नर्गिसची आर्त हाक आहे. सामाजिक, मानसिक, शारिरीक पातळीवर संघर्ष करणाऱ्या नर्गिसची अपरिहार्य शोकांतिका स्कॉर्पिओ या कथेतून पहावयास मिळते. अधोगतीला लागलेला पारशी समाज, गुस्ताद या वेडया भावाला सांभाळण्यासाठी, शारीरिक, मानसिक कुचंबनेमुळे नर्गिसच्या जीवनात अर्थ राहिलेला नाही. तिच्या एकाकी जीवनास तिचे व्यस्त जीवन कारणीभूत ठरले आहे. "एकापाठोपाठ एक आम्ही टॉवर ऑफ सायलेन्समध्ये जाणार"[११] असे ती तळमळून म्हणते. एकाकीपणाकडून ऱ्हासाकडे प्रवास करणाऱ्या नर्गिसच्या व्यक्तिमत्वाचा शोध चित्रेंनी या कथेद्वारा घेतला आहे.

१.३ अलौकिक व्यक्तिमत्वाचा व्यक्तिरेखा :

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्य हे वैविध्यपूर्ण आहे. त्यातील व्यक्तिरेखांचे संवेदनस्वभाव हे विविधांगी आहेत. एक प्रयोगशील कथात्म साहित्यिक म्हणून त्यांच्या लेखनाचा परामर्श घेताना त्यातील व्यक्तिरेखांचा विविधांगी संवेदनस्वभाव जाणून घेणे महत्वाचे ठरते. त्यांच्या कथात्म साहित्यामध्ये काही अलौकिक व्यक्तिमत्वाच्या व्यक्तिरेखा पहावयास मिळतात. चित्रेंचे बहुतांशी कथात्म लेखन हे व्यक्तिकेंद्री असल्यामुळे अशा साहित्यकृतीमध्ये ते प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीचा वापर करतात. चित्रेंच्या साहित्यातील बहुतांशी व्यक्तिरेखा ह्या तीव्र बुद्धिमत्ता, अतिशय संवेदनशील आणि तीव्र कल्पनाशक्ती असणाऱ्या आहेत. सबंध मानवी जीवनाकडे ह्या व्यक्तिरेखा एका वेगळयाच भूमिकेतून बघतात. त्यांची विचार

करण्याची शक्ती सामान्य माणसाहून उच्च पातळीवरची ठरते. म्हणून या व्यक्तिरेखा अलौकिक व्यक्तिमत्वाच्या ठरतात. 'जाराचं स्वगत', 'प्रतिभावंताचं मरण', 'सॅफायर' तसेच एब्राहामची वही' या साहित्यकृतीमधून प्रथमपुरूषी निवेदन पद्धतीद्वारे चित्रेंनी अलौकिक व्यक्तिमत्वाच्या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. त्यांच्या परामर्श घेणे महत्वाचे आहे.

'जाराचं स्वगत' या कथेतील 'मी' ही व्यक्तिरेखा अलौकिक व्यक्तिमतत्त्वाची ठरते. त्याच्याकडे प्रगल्भ वैचारिक जाणिव आहे. सामान्य माणसाहून त्याच्या विचारांची दृष्टी श्रेष्ठ ठरते. माणसामाणसामधील उत्कटतेविषयी या कथेतील मी ही व्यक्तिरेखा सखोल चिंतन करताना दिसते. या कथेतील निवेदकाचे उत्कटेविषयी व 'स्त्री' संबंधीचे विचार हे त्याच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेचे द्योतक आहेत. स्त्री-विषयक असणाऱ्या पारंपरिक विचांरापेक्षा प्रगल्भ विचार 'मी' ही व्यक्तिरेखा मांडते. तो म्हणतो, "उत्कटता ही अस्तित्वाची एकमेव कसोटी आहे."[१२] या जगात जन्म, वाढ, विस्तार, मैथुन, लढाया, मरण वगैरे प्रत्येक गोष्टीला ठराविक आकार आहेच. हा आकार फारसा बदलत नाही. म्हणजेच, बाहेरून पाहिलं तर माणसांना स्वेच्छा फारशी नाहीच. नियती मात्र प्रत्येकाला आहे. तरीसुद्धा माणूस उत्कटपणे जगू शकत नाही. याची 'मी' ला खंत वाटते. प्रेम या गोष्टीला त्याच्यामते खूप महत्व आहे. प्रेमाचा प्रत्येक क्षण उत्कटतेने जगला पाहिजे असे त्याचे मत आहे. त्याचप्रमाणे स्त्री-विषयक असणारी निवेदकाची मते त्याच्या प्रगल्भ, अलौकिक जाणिवांची द्योतक आहेत. तो स्त्री ला जगातील अपारंपार अशी आनंदमय गोष्ट मानतो. ही स्त्री आपल्याला आई, बायको, मुलगी, बहीण, मैत्रिण म्हणून पाहता येईल. जो स्त्री मुळे संपूर्ण होतो आणि स्त्रीला संपूर्ण करतो तो पुरूष असे त्याचे मत आहे. त्याचबरोबर प्रत्येक स्त्री-पुरूष संबंध हा प्रत्यक्ष शिव आणि शक्तीचा संबंध आहे असे मानून या कथेतील निवेदकाने स्त्री-पुरूष संबंधाला एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. अशाप्रकारे प्रगल्भ जाणिवेचे विचार या कथेतील अलौकिक व्यक्तिमत्वाच्या निवेदकाने मांडले आहेत.

'प्रतिभावंताचं मरण' या कथेतील 'मी' ही व्यक्तिरेखा देखील प्रगल्भ विचारसरणीची अलौकिक व्यक्तिरेखा ठरते. या कथेची सुरवातच निवेदकाच्या आधुनिक

विचार मांडले आहेत. या कथेची सुरवातच निवेदकाच्या "मी परमेश्वराची सावली पाहिली आहे."[१३] या विधानापासून होते. मानवी जीवनावद्दलचे सखोल चिंतन निवेदक या कथेतून मांडतो. खरोखरीचा कलावंत, फसवेगिरी करणारा व बुद्धिमान माणूस या तीन प्रतिभावंताच्या भावविश्वाचा परामर्श या कथेतून निवेदकाने घेतला आहे. "प्रत्यक्षात एक मानवी संबंध उत्पन्न करता येणं दहा महाकाव्य लिहिण्यासारखं अवघड आहे."[१४] असा चित्रेंचा प्रतिभावंत निवेदक म्हणतो. मानवी संबंधाविषयी हे त्याचे एक प्रगल्भ विचारसरणीचे निरीक्षण आहे. अशाप्रकारचे आधुनिक विचार निवेदक या कथेतून मांडतो.

'सॅफायर' ही लघुकादंबरी चित्रेंच्या अलौकिक अनुभवविश्वाची द्योतक आहे. ही संबंध कादंबरी सॅफायर नावाच्या दागिण्यात जडविण्याच्या खड्याभोवती फिरत राहते. या कांदबरीतील 'मी' ही व्यक्तिरेखा 'सॅफायर' चा खडा आजमावून पाहण्याच्या ध्यासाने पछाडलेली आहे. पण या खडयाचा लौकीक असा की, तो खडा शंभरापैकी एकालाच लाभतो बाकी नव्याण्णव जणांना त्याचा वाईटच अनुभव येतो. प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीतून साकार होणारी ही लघुकादंबरी 'मी' या व्यक्तिरेखेला प्राप्त झालेल्या अलौकिक व्यक्तिमत्वातून प्रकट होते. नायकाला सॅफायरच्या खडयामुळे येणारे अनुभव अलौकिक पातळीवरचे आहेत. सॅफायरमुळे नायकाच्या संपूर्ण जीवनालाच एक प्रकारचे अलौकिक स्वरूप प्राप्त होते. नायकाने सॅफायर खरेदी केल्यानंतर त्याच्या संपूर्ण जीवनात अभुतपूर्ण बदल घडून येतात. नायकाला सट्टयामध्ये भरपूर पैसा मिळतो, क्लॉडिया नावाची सुंदर सेक्रेटरी जिचे नायकाला आकर्षण असते ती त्याला शरण येते, नोकरीमध्ये बढती मिळते. मोटार, फ्लॅट, पगारवाढ यासारख्या सुखासोयी नायकाच्या जीवनालाच वदलून टाकतात. नायकाभोवती एक प्रकारचे अलौकिकतेचे वलय निर्माण होते. एका बाजूने नायक भरपूर सुखाचा उपभोग घेत होता, भौतिक सुखात तो लोळत होता. पण दुसऱ्या बाजूने तो आपल्याच नात्यापासून दूरावत चालला होता. नायकाला अचानक मिळालेल्या यशाने पत्नी, मुलगा, मित्रमंडळी बावरून गेली. त्यांना नायकाची भिती वाटू लागली. या साऱ्यांपासून आपण तुटत चाललो आहे याची जाणिव नायकाला होते. आणि नायक सॅफायर नष्ट करायचा ठरवतो. अशाप्रकारे सॅफायर या

खडयाभोवती फिरणाऱ्या नायकाच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचा आलेख या लघुकादंबरीत पहावयास मिळतो.

'एब्राहामची वही' ही लघुकादंबरीदेखील चित्रेंच्या वैयक्तिक जीवनानुभवाचे चित्रण असणारी आहे. प्रथमपुरूषी निवेदन पद्धतीतून ही लघुकादंबरी साकार होते. एब्राहामच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न इथे चित्रे यांनी प्रभावीपणे केलेला दिसतो. एब्राहाम हा लेखकाचा मित्र होता. तो मराठी भाषा ज्यू म्हणजे वेने इस्त्रायली होता. त्याचं नाव एब्राहाम बेंजामिन असे होते पण लेखक त्याला बेंजी म्हणत असे. बेंजी हा अतिशय अलौकिक बुद्धिमत्ता लाभलेला माणूस होता. वाङ्मय, नाट्य, चित्रपट, संगीत, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, इतिहास अशा विविध विषयात तो पारंगत होता. तो प्रशिक्षित नाटयदिग्दर्शक आणि नट होता. शेक्सपियरीन नाटकापासून आधुनिक नाटकापर्यंत सर्व नाटके त्याने हाताळली-अभ्यासली होती. काही वर्ष इंग्लडमध्ये, अमेरिकेत तो शिक्षण घेऊन आला होता. लेखकाच्या शिफारशीमुळे त्याला अकाऊंटस् एक्झिक्युटिव्ह म्हणून काम मिळाले होते. बेंजी हा मानसिक व्याधीने ग्रस्त होता. त्याला पॅरानॉइड स्किझ्झोफ्रेनिया या मानसिक व्याधीनं ग्रासलं होतं. पुढे त्यातच बेंजीचा मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी बेंजीने लेखकाला रजत छापाची सहाशे पानी वही वाचायला व ठेवायला दिली. या वहीत मानसशास्त्र व नीतिशास्त्र या विषयावरचे बेंजीचे अभिप्राय, समीक्षा, विचार आणि फेरविचार होते. 'हे सर्व तुझ्याकडे ठेव मी सर्व काही व्यवस्थित मांडून ठेवलं आहे.' असे बेंजी लेखकाला सांगतो. त्यानंतर काही दिवसातच बेंजीचा मृत्यू होतो.

बेंजीच्या मृत्यूनंतर एब्राहामची रजत छापाची सहाशे पानी वही लेखकाने जपून ठेवली. त्याने ती अनेकदा वाचली. त्या वहीतल्या विचारांनी लेखक भारावून जातो. त्यातले विचार लेखकाला स्वस्थ बसू देत नाहीत. त्यातील विचारांनी त्याची अवस्था झपाटल्याप्रमाणे होते. या झपाटलेल्या अवस्थेत लेखकाच्या गतकाळातील घटनांना, विचारांना, अपूऱ्या इच्छा-आकांक्षांना उजाळा मिळतो. आणि एका गूढ वातावरणात बेंजीच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचा दृश्यरूप आविष्कार लेखकाचा पाठपुरावा करतो. भास-अभास, वास्तव-अतिवास्तव

फॅन्टसीसदृश्य दृश्यातून ही लघुकादंबरी एब्राहामच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचा प्रत्यय देते.

अशा प्रकारे दिलीप चित्रे यांनी आपल्या कथात्म साहित्यामध्ये तीव्र बुद्धिमत्ता असणाऱ्या अलौकिक व्यक्तिमत्वाच्या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत.

१.४ स्त्री व्यक्तिरेखा :

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना त्यांच्या स्त्री-व्यक्तिरेखांचा स्वतंत्रपणे विचार करणे महत्वाचे ठरते.१९६० नंतरच्या मराठी कथात्म साहित्यामध्ये दिलीप चित्रे यांच्या लेखनाने प्रयोगशीलता आणली. आशय, विषय, अविष्कार, भाषा या सर्वच दृष्टीने चित्रे यांचे कथात्म साहित्याच्या जडणघडणीमध्ये दिलीप चित्रे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील स्त्री व्यक्तिरेखांचा परामर्श घेण्याआधी त्यांची स्त्रीविषयक भूमिका लक्षात घेणे महत्वाचे ठरते.

दिलीप चित्रे हे एकूणच मानवी जीवनाबद्दल आस्था असणारे साहित्यिक आहेत. माणसाच्या अस्तित्वाबावत त्यांनी सखोल चिंतन केले आहे.त्यांच्या एकूणच साहित्यलेखनात स्त्री ही महत्वाची भूमिका पार पडताना दिसते. चित्रे स्त्रीला जगातील सर्वात अपारंपार अशी आनंदमय गोष्ट मानतात. त्यांच्या कथात्म साहित्यातील स्त्री ही आत्मशोधाच्या भावनेने प्रेरित झालेली आहे. एक आदिम रूप म्हणून चित्रे स्त्रीला आपल्या कथात्म साहित्यातील महत्वाचे स्थान देतात. चित्रे यांच्या कथात्म साहित्यात स्त्री-पुरूष संबंधाला एक वेगळेच परिणाम आहे. प्रत्येक स्त्री-पुरूष संबंध त्यांना प्रत्यक्ष शिवाचा आणि शक्तीचा संबंध वाटतो. त्याचबरोबर स्त्री बद्दलची, स्त्री देहाबद्दलची शरीर निदर्शक वर्णने त्यांच्या कथात्म साहित्यकृतीतून पहावयास मिळतात. या वर्णना-चित्रणातून चित्रे स्त्रीच्या मुळ अस्तित्वापर्यंत जाण्याचा प्रयत्न करतात. स्त्रीला आदिम रूपात प्रकट करण्यामागे चित्रे यांची भूमिका ही अध्यामिक असल्याची दिसून येते. 'स्कार्पिओ' कथेमधील 'नर्गिस', केसाळ काळंभोर पिल्लू', मधील 'मिसेस राणे' असो किंवा 'द फुल मून इन विंटर' या लघुकादंबरीतील 'ललिता होनावर' असो या स्त्री व्यक्तिरेखांना आधुनिक काळात समाजात वावरत असताना किती प्रचंड वेदनामय आयुष्याला सामोरे जावे लागत आहे. याचा परामर्श चित्रे आपल्या कथात्म साहित्यामधून

घेतात. असुरक्षितता व अस्वस्थेमुळे शारीरिक, मानसिक कोंडमाऱ्यामुळे या स्त्रीया दुसऱ्या व्यक्तिंशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करतात. पण त्यात त्या अयशस्वी होतात आणि त्यांच्या पदरी निराशाच पडते. चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये घडणारी आणखी एक महत्वाची घटना म्हणजे त्यातील बहुतांशी व्यक्तिरेखा या समाजाने प्रस्थापित केलेली नाती नाकारतात. उत्कटपणे त्यांची जगण्याची धडपड विलक्षण असते. चित्रे यांच्या स्त्री-व्यक्तिरेखाही अशाच प्रकारे उत्कटपणे जगू इच्छितात. स्वत:च्या अस्तित्वविषयक प्रश्नांनी गोंधळलेल्या स्त्री व्यक्तिरेखा चित्रे यांच्या कथात्म साहित्यात प्रामुख्याने पहावयास मिळतात.

'ऑर्फियस' ही कथा ॲना आव्हाकियान नावाच्या आर्मेनियम तरूणीच्या अस्तित्वाचा वेध घेणारी आहे. ॲना आव्हाकियान व या कथेतील निवेदक 'मी' हे दोघेही एकाच दिवशी एकाच वर्षी जन्मली आहेत. पण वयाच्या विसाव्या वर्षी ॲना आव्हाकियानचा मृत्यू झाला आहे. कबरस्तानमधील थडग्यावरील ॲना आव्हाकियानच्या जन्म-मृत्यूची नोंद वाचून निवेदक तिच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. शेवटी एका स्वप्नसदृश्य दृश्यात ॲना निवेदकाला सामोरी येते. या कथेमध्ये ॲना आव्हाकियानचा प्रत्यक्ष वावर नाही पण अप्रत्यक्षरित्या तिचा वावर संबंध कथेतून आढळतो. ॲनाच्या अस्तित्वाचा शोध हा या कथेचा मूळ गाभा आहे. ॲना आव्हाकियान दिसायला कशी होती? तिचा मृत्यू कशाने झाला? या प्रश्नांभोवती निवेदक 'मी' ची भावस्थिती फिरत राहते आणि ॲना आव्हाकियानच्या नसतेपणातून तिच्या असतेपणाचा शोध या कथेतील निवेदक घेताना दिसतो.

'केसाळ काळंभोर पिल्लू' या कथेतील मिसेस राणे ही व्यक्तिरेखा दिलीप चित्रे यांनी अत्यंत प्रभावीपणे रेखाटली आहे. राणेबाईच्या एकाकीपणाचा वेध चित्रे यांनी घेतला आहे. मिसेस राणे ह्या एका कंपनीच्या मॅनेजरच्या पर्सनल असिस्टंट आहेत. पैसा, उच्च राहणीमान असूनही मिसेस राणे एकाकी आहे. लग्नानंतर मिसेस राणेंना शारीरिक सुख लाभले नाही. तिचा नवरा मोठा पगारदार पण अर्थहीन लंपट जीवन जगणारा माणूस आहे. मिसेस राणे शारीरिक, मानसिक कुचंबनेतच आयुष्य कंठीत आहेत. प्रेमापासून वंचीत राहिल्यामुळे राणेबाईंचे जीवन एकाकी बनले आहे. "इतरांना वाटते मी बंद, क्लोज्ड, अगदी क्लोज्ड

आहे."[१५] असे ती तळमळून म्हणते खरे म्हणजे कोणत्याही सर्वसामान्य स्त्रीला हवे असेल ते सारे तिला हवे असते, प्रेम हवे असते. भौतिक सुखापेक्षा मानसिक, शारीरिक गरजांची पूर्तता मानवी जीवनामध्ये महत्त्वाची असते. मायेचा प्रेमळ स्पर्श माणसाला उत्कटपणे जगण्यासाठी आवश्यक असतो.तो जर नसेल तर माणसाचे जीवन एकाकी, अर्थहीन बनते. मिसेस राणे म्हणते त्याप्रमाणे,"माकडीचं मूल मेलं तर बरेचदा तिला कळत नाही. मेलेलं मूल पोटाशी धरून ती भटकत असते. मग त्याला ती पुरते.नंतर त्याचं कातडं घेऊन फिरते. त्या कातड्यावरून हात फिरवते."[१६] अशा प्रकारच्या स्पर्शालाच मिसेस राणे पोरकी झाली आहे. विठ्ठल जामखेडकरला ती आपल्या घरी घेऊन येते.विठ्ठलही पापभीरू एकाकीपणे जगणारा माणूस आहे. ती त्याला व्हिस्की पिण्याचा आग्रह करते.विठ्ठल विचारा एकाकीच पण अबोल राहतो. पण आज व्हिस्की घ्या, मला प्रश्न विचारा, नाहीतर मला वेडसुद्धा लागेल असे विठ्ठलला ती सांगते. दि.के.बेडेकर म्हणतात त्याप्रमाणे, "स्त्रीच्या असहय कोंडमाऱ्याचे फार अस्वस्थ अंतर्मुख करणारे, हृदयाचा वेध घेणारे वर्णन चित्रे यांनी केले आहे."[१७] दुसऱ्या माणसाच्या अनोळखी आवाजाचाही स्पर्श याचना करून मागणारी ही स्त्री एक उदास प्रेमहीन व अर्थहीन जिणे कंठीत आहे. तिचा नवरा उनाड वायकांकडे जातो, तो वांझोटा व करडा आहे, यशस्वी आहे पण पोकळ आहे.मिसेस राणेला हे यशस्वी, सुखी, आळसावलेले लोक आवडत नाहीत.यश आणि भौतिक सुख यांना मिसेस राणे विटल्या आहेत, ते केवळ या गोष्टी मुबलक मिळाल्या आहेत म्हणून नव्हे तर त्यांना उबग आहे, ती आळसावलेल्या हृदयांची मिसेस राणे विठ्ठलला घरी आणतात.दारू पाजतात व पितात, नंतर दोघे संभोग करतात.पुढे मिसेस राणेंना आत्महत्या करावीशी वाटते पण त्या करीत नाहीत.कथेच्या शेवटी चित्रे यांनी विठ्ठलची कैफियत मांडली आहे.मिसेस राणेंनी आत्महत्या केली की विठ्ठलने त्यांचा खून केला या संदिग्धतेत ही कथा संपते आणि उरते ती फक्त मिसेस राणेंच्या एकाकी जीवनाची शोकांतिका चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात त्याप्रमाणे ही कथा म्हणजे, "मनातील ग्रंथीनी किंवा शिष्टतेच्या खोट्या मुखवट्यांनी समागम सुखापासून स्वत:ला वंचित करणाऱ्या स्त्रीच्या संपलेल्या आयुष्याची कथा आहे."[१८] मिसेस राणे ही व्यक्तिरेखा संभ्रमावस्थेत जगत असते म्हणून या

कथेचा शेवटही संभ्रमावस्थेत होतो. या संभ्रमावस्थेत होणारी मिसेस राणेंची कैफियत मांडली आहे.

१.४.१ पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी कुचंबना :

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील स्त्री व्यक्तिरेखांचा आढावा घेत असताना जाणवणारे एक महत्त्वाचे विशेष म्हणजे ह्या स्त्रीया पुरुषप्रधान संस्कृतीत कुंचबलेल्या आहेत. त्यांच्या बहुतेक कथात्म साहित्यकृतीतून पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी कुचंबना प्रत्ययास येते. अस्तित्ववादी जाणिवा प्रकट करणे हे चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे प्रधान आशयसूत्र आहे. पुरुषी वर्चस्वाखाली दबलेल्या, शारीरिक, मानसिक कुचंबना होणाऱ्या, अस्तित्वहीन अशा स्त्री व्यक्तिरेखा चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये प्रामुख्याने पहावयास मिळतात. त्या व्यक्तिरेखांच्या आढावा घेणे महत्वाचे ठरते.

'दहा हजार शब्द' या कथेतील प्रोफेसरांच्या वायकोला सुलूला वैवाहिक जीवनात किती वेदनामय जीवन जगावे लागत आहे याचे चित्रण येते. या कथेतील प्रोफेसर व त्यांची पत्नी सुलू यांच्या वयामध्ये पंधरा वर्षाचे अंतर आहे. आपल्यापेक्षा लहान असणाऱ्या पत्नीच्या शारीरिक गरजांची पूर्तता प्रोफेसर करू शकत नाहीत, अशावेळी सुलूची शारीरिक पातळीवर कुचंबना होते. ही कुचंवना प्रोफेसर समजू शकत नाहीत. प्रोफेसरांसमवेत सुलू फिरायला जाते तेव्हाही ती निश्चलच असते. आपली प्रत्येक कृती ती यांत्रिकपणे करत असते. शारीरिक अपूर्ततेमुळे तिला एक प्रकारचा निर्जिवपणा प्राप्त झालेला असतो. या निर्जिवपणामुळे, शारीरिक कुचंबनेमुळे प्रोफेसरांना सुलूच्या मिठीत असतानाही आपण एकटेच असल्याचा भास होतो. "अलिकडं नं मला असंच वाटतं-तुमच्याएवढा उत्साह वाटत नाही... मला तर अलिकडं आपलं वय झाल्यासारखं वाटत असतं."[१९] यासारख्या विधानातून सुलू आपली कोंडी व्यक्त करते. एका स्त्रीला हवे असणारे परिपूर्ण सुख प्रोफेसर सुलूला देऊ शकत नाहीत. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी कुचंबना सुलू सहन करताना या कथेतून दिसते.

'केसाळ काळंभोर पिल्लू' या कथेतील विठ्ठल जामखेडकरची आजी ही सुद्धा पुरुषप्रधान संस्कृतीत अन्याय सहन करणारी व्यक्तिरेखा ठरते. पतीच्या सेवेत आणि

नातवाच्या पालनपोषनात स्वत:चे अस्तित्व हरवून गेलेली आजी ही एक विलक्षण स्त्री व्यक्तिरेखा आहे. या कथेत आजीचा त्रोटक व थोडाच पण महत्वाचा उल्लेख आहे. विठ्ठल जामखेडकरची ही आजी आंधळी होती पण तरीही ती सुंदर भरतकाम करायची. तिची सुई डोळस होती. जन्मभर आजीने हजारो नक्षा भरल्या. तिला स्वत:चे भरतकाम दिसायचे नाही, पण एकेक टाका घालताना केवढा नेमकेपणा होता, नाजुकपणा होता. मरण्यापूर्वी आजीने विठ्ठलला आपल्या खरबरीत हातानं खोलवर चापचलं. जणू काय तिला विठ्ठलच्या अस्तित्वालाच स्पर्श करायचा होता. आजीच्या व्यक्तिरेखेद्वारे चित्रे अस्तित्वशोधासाठी स्पर्शा नुभवाला अग्रक्रम देतात.

'अंधारातला अप्रेंटिस' या कथेतून उषाच्या असहाय जीवानाचे चित्रण येते. उषा ही गुजराती आई आणि मराठी वाप यांची मुलगी. तिशीच्या आसपास वय असणारी उषा एका सामाजिक संघटनेसाठी काम करते. या संघटनेमध्ये निरंजन व सावंत हे दोघे काम करतात. या दोघांच्या संबंधामध्ये गुरफुटून उषाची मानसिकता द्विधा झाली आहे. सावंत तिच्याकडे वाईट नजरेने पाहतो. निरंजनाशी तिचे शारीरिक संबंध आहेत. हे संबंध लग्नाआधीचे आहेत. उषाची असहाय्यता निरंजनाला माहित आहे, म्हणून तो तिला क्रुरपणे छळतो. अशाप्रकारे पुरुषप्रधान संस्कृतीला वळी पडलेल्या उषा या व्यक्तिरेखेचे चित्रण चित्रे यांनी प्रभावीपणे रेखाटले आहे.

'टाइपरायटर' या कथेतील नर्स पुरुषप्रधान व्यवस्थेला बळी पडलेली व्यक्तिरेखा आहे. तिच्या स्त्री-सुलभ भावनांना मारून टाकण्यासाठी डॉक्टर तिला पुरुषी हार्मोन्सची इंजक्शन देतात. परिणामी तिचे पाय पुरूषी वनतात. तिच्या पायावर दाट केस येतात, पण तिच्यातील भावना या स्त्री-सुलभच राहतात. नर्सच्या स्त्रीत्वावर अन्याय करणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीचा क्रूर खेळ या कथेतून प्रत्ययास येतो.

नर्गिसच्या उध्वस्त भावविश्वाचे चित्रण 'स्कॉर्पिओ' या कथेतून येते. शारीरिक, मानसिक, सामाजिक कुचंवनेतून अस्तित्वहीन झालेल्या नर्गिसची शोकांतिका या कथेतून प्रत्ययास येते. आजची स्त्री ही स्वयंसिद्धा वनली आहे. अर्थाजन करून ती

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आपल्या कुटुंबाचा दर्जा सुधारू पाहते आहे. पण हे सर्व करीत असताना तिला विविध पातळयांवर संघर्ष करावा लागतो आहे. नर्गिसच्या वाटेला आलेला संघर्ष तर फार विकट आहे. म्हातारे आई-वडील व वेडा भाऊ गुस्ताद यांच्यासमवेत ती एका जुन्या पारशी पद्धतीच्या घरामध्ये राहते. एकलकोंडेपणे जगण्याची नर्गिसची मानसिक, शारीरिक कुचंवना या कथेतून प्रत्ययास येते.

'रुधिराक्ष' या लघुकादंबरीतील रूधिराक्षची प्रेयसी पुरुषी संस्कृतीखाली दबलेली व्यक्तिरेखाा आहे. रुधिराक्ष बरोबर ती लग्न करू शकत नाही कारण, रूधिराक्षचे वर्तन विक्षिप्त स्वरूपाचे असते. आपल्या लग्नाच्या नवऱ्यासोवत ती सुखी नसते. संभोगक्रियेवेळेही ती निर्जिव भासत असते. दुसरीकडे रूधिराक्षच्या विक्षिप्त वागण्यामुळे ती त्याच्याबरोबर राहू शकत नाही उलट रूधिराक्षच्या विक्षिप्त वागण्याचा तिला त्रासच अधिक होतो. अशा प्रकारे पुरुषी वर्चस्वाखाली अन्यायग्रस्त असलेल्या स्त्रीचे विदारक चित्रण या लघुकादंबरीतून येते.

ललिता होनावर ही व्यक्तिरेखा 'द फुल मून इन विंटर' या लघुकादंबरीतील बलस्थान आहे. आधुनिक काळात समाजामध्ये वावरत असताना स्त्रियांना किती कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागते आहे याचे चित्रण प्रस्तुत लघुकादंवरीतून येते. दिसायला सुंदर पण निर्विकार आणि थंड स्वभावामुळे ललिता होनावरला 'द फुल मून इन विंटर' असा शेरा नायकाच्या मित्रमंडळाकडून मिळतो. या शेऱ्याचा तिच्या मनावर खूप खोलवर परिणाम होतो. एकूणच पुरुष जातीवद्दल तिच्या मनामध्ये तिरस्कार निर्माण होतो. परिणामी होनावर वैवाहिक जीवनाचा आनंद घेऊ शकत नाही. ती लग्नच करीत नाही. या सर्व कुचंवनेमुळे ललिता होनावर आत्महत्या करते. एकूणच पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची शारीरिक, मानसिक कुचंवना किती भयावह रूप धारण करू शकते त्याचा प्रत्यय ललिता होनावर या व्यक्तिरेखेद्वारे येतो.

सारांश :

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिचित्रणातील वैविध्य ध्यानात येते. या व्यक्तिरेखांचे नेमके स्वरूप लक्षात येते. दिलीप चित्रे यांनी आपल्या कथात्म साहित्यातून एका विशिष्ट जीवनसृष्टीचा पुरस्कार उपरोक्त व्यक्तिरेखांच्या माध्यमातून केला आहे. अस्तित्ववादी जाणीवा प्रकट करणे हे चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे प्रमुख आशयसूत्र असल्यामुळे अस्तित्ववादी जाणीवसूत्रांचे प्रभावी प्रकटीकरण त्यांच्या व्यक्तिरेखांद्वारे प्रकट होताना दिसते. आधुनिक काळात एकाकीपणे, असहाय्य जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखा चित्रे यांच्या बहुतांशी साहित्यकृतीतून पहावयास मिळतात. अस्तित्वशोधासाठी धडपडणे हे या व्यक्तिरेखांचे समानसूत्र आहे. अद्‌भूत, अलौकिक, गूढ वाटणाऱ्या अशा व्यक्तिरेखा चित्रे यांच्या कथात्म साहित्यातून पहावयास मिळतात. या व्यक्तिरेखांची वर्तनपद्धती सर्वसामान्य, रूढ व्यक्तिरेखांपेक्षा वेगळया, तऱ्हेवाईक स्वरूपाच्या आहेत. स्त्री व्यक्तिरेखांद्वारे स्त्रीची कोंडलेली अवस्था, विशिष्ट समाजसंस्कृतीत तिची होणारी घुसमट चित्रे प्रकट करतात. दिलीप चित्रे यांचे व्यक्तिरेखा चित्रणाचे कौशल्य विलक्षण आहे. चित्रे प्रत्येक व्यक्तिरेखेचे अंतरंग तसेच बहिरंग मोठया प्रभावी पद्धतीने रेखाटतात. या साऱ्या व्यक्तिरेखांच्या मनोदर्शनाबरोबरच त्यांच्या कृतीतून साहित्यकृतीतील कथानुभव उलघडतो. हा चित्रे यांच्या कथात्म लेखनाचा एक महत्त्वाचा पैलू मानता येईल.

संदर्भग्रंथ सूची :

१. बांदिवडेकर चंद्रकांत : 'मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप', संपा. गो. मा. पवार म. द. हातकणंगलेकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८६, पृष्ठ-१९७.

२. क्षीरसागर उत्तम : 'दिलीप चित्रे यांचे कथाविश्व', प्रस्तावना, ऑर्फियस साकेत प्रकाशन, १९६८.

३. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : 'केसाळ काळंभोर पिल्लू' - ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृष्ठ-३४.

४. डहाके वसंत आबाजी : 'मराठी प्रयोगशील कादंबरी', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मराठी विभागांतर्गत उद्बोधन वर्गात झालेल्या व्याख्यानातून उधृत, २००५.

५. डहाके वसंत आबाजी : तत्रैव.

६. डहाके वसंत आबाजी : तत्रैव.

७. फडके भालचंद्र : 'दिलीप चित्रे यांचे कथालेखन', प्रतिष्टान, सप्टें. १९७0, पृ. २८.

८. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : 'दहा हजार शब्द' -ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ. ९.

९. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : 'वांसासि जिर्णानि'-ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ. १३.

१0. फडके भालचंद्र : 'दिलीप चित्रे यांचे कथालेखन', प्रतिष्ठान, सप्टें. १९७0, पृ. २७.

११. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : 'स्कॉर्पिओ'-ऑर्फियस, साकेत, प्रकाशन, १९६८, पृ. ११४.

१२. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : 'जाराचं स्वगत' - ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.९७.

१३. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : 'प्रतिभावंताचं मरण'-ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.१२३.

१४. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : तत्रैव, पृ.१२७.

१५. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : 'केसाळ काळंभोर पिल्लू' -ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.४७.

१६. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : तत्रैव, पृ. ४९-५०.

१७. वेडेकर दि.के. : 'साहित्यातील बीभत्स गारठा' - सत्यकथा, मार्च १९६७, पृ.६८.

१८. बांदिवडेकर चंद्रकांत : 'मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप', संपा. गो.मा.पवार, म.द.हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.१६८.

१९. चित्रे दिलीप पुरुषोत्तम : 'दहा हजार शब्द'- ऑर्फियस, साकेत प्रकाशन, १९६८, पृ.९६.